ये.का.मु.-४०,००० पु. (२५ x ६)-०८-२०१०-ए ३-वि (वाय) ३५६

FORM - 1A N.C.R.B.

I.I.F.-1

# पहिली खबर

## FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र जिल्हा District मुंबई पोलीस ठाणे Police Station का.प्र.टी. पहिली खबर क्र. FIR No. 34/2018 वर्ष Year ........ दिनांक Date 17/10/2018

2. (i) अधिनियम Act लाचलुचपत प्रतिबंधक अधि. 1988 कलमे Sections 7
   (ii) अधिनियम Act (सुधारित) 2018 प्रमाणे कलमे Sections ........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : वार Occurence of offence : Day ........ तारीख पासून Date from 12/9/18 वेळ Time ........ तारीख पर्यंत Date to 9/10/2018 वेळ Time ........

   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी अशी खूण करा. Tick applicable portion)

3. (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00 (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00

   (b) पो. ठा. ला माहिती मिळालेची Information received at P. S. तारीख Date ........ वेळ Time ........

   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 26 तारीख Date 17/10/18 वेळ Time 17.35

4. माहितीचा प्रकार Type of information : लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा म्हाडा कार्यालय वांद्रे मुंबई चौकी/बीट/दूरक्षेत्र नाव व क्र. 8 K.M.
   Place of Occurence : (a) Direction and distance from P.S. Chouki/Beat/O.P. Name and No.

   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurence Name म्हाडा कार्यालय ठिकाणाचे नंबर No. if any ........ गल्ली Ward कलानगर रस्त्याचे नाव Name of road वांद्रे मुंबई

   जवळचे ओळख चिन्ह/ठिकाण Nearest Adentifiable Place कलानगर जंक्शन गाव Village ........ पोस्ट Post ........ तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........

   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ........ तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant/Informant : Permanent Address

   (a) नाव Name शफीक अहमद (b) वडिलाचे / पतीचे नाव Father's / Husbands Name मोहम्मद युनुस

   (c) जन्मतारीख व वय Date of Birth & Age 52 वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. 9892-94615

   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ........ दिल्याचा दिनांक Date of Issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation विकासक

   (g) धर्म Religion मुस्लीम जात Caste ........ जनजात Sub-Caste ........

   (h) पत्ता : गल्ली/सर्व्हे नं. Address : Ward 15वा मजला अहमद पॅलेस घर/नाव नंबर House/Name No. ........ फोन/मो. नंबर Phone/M. No. ........ पॅन नं. Pan No. ........ ओटर्स नं. Card No. ........

   रस्त्याचे नाव Road ........ जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place इक्बाल मेडीकल स्टोअर M.A. रोड गाव Village भायखळा पोस्ट Post मुंबई-11 पो.स्टे P. Stn. ........

   तालुका Taluka ........ जिल्हा Dist. मुंबई राज्य State महाराष्ट्र सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म I B वर वेगळ्या सिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व स. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे).
   Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary) (If suspect particular of physical feature write on Form I-B of attach FIR I-B to case diary).

   श्री अमुल सुद्धाडेकर वय अंदाजे 40 वर्षे व्यवसाय नोकरी [उपअभियंता] नेमणूक कार्यकारी अभियंता कार्यालय म्हाडा 3 रा मजला वांद्रे मुंबई
   मो. नं. 9822239412

398 8. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे फिर्यादी कडुन विलंब
Records for delay in reporting by the Complainant/informant

9. चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तार मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proform) write down details on blank back page.

........................................................................................................................................

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ........................................................................................
Total value of properties stolen and involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recover Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ........................................................................................
Unnatural/Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील को-या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

सदरील नमूद तारीख वेळी व ठिकाणी आरोपी यांनी आपल्या पदाचा गैर वापर करुन घेतलेल्या स्वाधीन लाच मिळविण्याकरीता फिर्यादी हे पुर्नविकसीत काम करीत असलेल्या घोडी तलाव येथील बांधकामाच्या करीता लागणारी (NOC) ना-हरकत प्रमाणपत्र संबंधीत कागदपत्रे सादर केली होती फिर्यादी यांना NOC देणे करीता आरोपी यांचे कुडाळकर ३५ - अधिकांश मध्ये बोईदा यांनी फिर्यादी यांचेकडुन रुपये रक्कम 18,00,000/- रु. मागणी करुन त्यापैकी आधी रुपये 13,50,000/- चे लाच मागणी केली म्हणुन त्यांचेवर कायदेशीर कारवाई होणेबाबत फिर्याद आहे.

13. केलेली कार्यवाही .— 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला. तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा जयदेव वकवी (पोलीस निरीक्षक)

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण. ........................................................................................

3. दुस-यां पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन .............................. जिल्हा .............................. राज्य ..............................

*Action taken* .— Since the above information reveals Commission of offence (s) u/s. as mentioned at Item No. 2 :

(1) Registered case and took up the investigation or Directed (Name of I. O.) .............. Rank .................. No. ..............
to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ............................................................ (3) Transferred to P. S. ..............................
District ........................................ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून/वाचून/ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant/Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.

(R.O.A.C.)

[signature]

पोलीस ठाणे प्रभारी अधिका-याची सही.
Signature of Officer Incharge, Police Station.
संपूर्ण नाव Name जयदेव वकवी
पदनाम Rank पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड क्र.
Posting
Coding No. of I. O. ..............................

[signature]

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant/Informant

15. १. न्यायालयास सादर केल्याची तारीख .............
1. Date and time of submitted to the Court

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

साक्षीदार क्रिमोदी श्री शकील अहमद मोहमंद युनुस वय 52
वर्षे धंदा - विक्रेता ए. ले. अक्सा बैठक रुम नं (6 वा) माळा हुजा
मोहल्ला समोर एम. ए. रोड आग्रीपाडा मुंबई - 11
यांनी दि. 17/10/2018 रोजी दिलेला स्वतंत्र जबाबावर सही केलेली
असल्याने अजून ती सादर करण्यात आलेली आहे.

स्वाक्षरी
[signature]
(जगदीश वळवी)
पो.नि. प्र.सी मुंबई

[signature] Shakeel

जबाब दिनांक :— १७/१०/२०१८

मी, शकील अहमद मोहम्मद यूनुस, वय ५२ वर्षे, धंदा—विकासक, रा.ठि, सदनिका क्र.१५०१ ते १५०४, १५ वा माळा, अहमद पॅलेस समोर, झुलामैदान, एम ए रोड, आग्रीपाडा, मुंबई ४०० ०११

मी, वरीलप्रमाणे असुन वर नमुद पत्त्यावर माझे परिवारासह राहतो. माझा विकासकाचा व्यवसाय असून, मी जुन्या व जीर्ण झालेल्या इमारतीचे पुर्नविकास करण्याचा व्यवसाय गेल्या १४.वर्षा पासुन करतो.

श्रीमती परिचेर खुदाबक्ष झोराबीअन यांचे मालकीची अल्पाईवाला नावाची एक जुनी इमारत, धोबीतलाव, मुंबई या ठिकाणी असून, सदर इमारतीचा पुर्नविकास करण्याकरीता त्यांनी मला दि. ३१/०५/२०१८ रोजी कुलमुखत्यार पत्र दिलेले आहे. सदर जागेचा पुर्नविकास करण्यासाठी मी श्रीमती परिचेर खुदाबक्ष झोराबीन यांचे वतीने म्हाडा कार्यालयात 'नाहरकत प्रमाणपत्र' मिळणे करीता दिनांक ०२/०४/२०१८ रोजी अर्ज केला होता. सदर अर्जाबाबत मी वेळोवेळी म्हाडा कार्यालयात जावुन चौकशी करत होतो. मी म्हाडा कार्यालयात ना हरकत प्रमाणपत्र संदर्भात, संबंधित म्हाडा कार्यालयातील अधिकारी लोकसेवक श्री अमूल, उप अभियंता, निवासी कार्यकारी अभियंता यांना भेटलो असता, त्यांनी मला नाहरकत प्रमाणपत्र देण्यासाठी रू. १८,००,०००/—इतक्या लाचेच्या रकमेची मागणी केली होती. सदरची लाच देण्यास मी त्यांना नकार दिला असता, त्यांनी त्यांचे कार्यालयातील मुख्य अधिकारी जगदाळे यांचेशी माझे कामा विषयी चर्चा करून माझ्या अर्जात त्रुटी काढुन मला २ महीन्यानंतर येण्यास सांगितले असता मी तेथुन निघुन गेलो.

त्यानंतर मी माझे कुटुंबियांसमवेत जुन व जुलै महीन्यात सौदी अरेबिया येथे उम्रा करीता गेलो असल्याने मला म्हाडा कार्यालयात जायला जमले नाही. तेथुन आल्यावर मी साधारण ऑगस्ट महीन्यात म्हाडा कार्यालयात गेलो असता, तेथील सर्वजण हिवाळी अधिवेशनाकरीता नागपुर येथे गेल्याचे समजले. त्यानंतर साधारण सप्टेंबर महीन्यात मी पुन्हा माझे ना हरकत प्रमाणपत्राकरीता म्हाडा कार्यालयात गेलो असता, तेथील एक लोकसेवक श्री. चापलकर यांनी, मला सांगितले की, मी वरिष्ठांना लाच दिल्याशिवाय माझे काम होणार नाही.

मला माझे कामाकरीता कोणालाही लाच देण्याची इच्छा नसल्याने, विचाराअंती मी या संदर्भात दिनांक १२/०९/२०१८ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे लेखी तक्रार अर्ज दिला. माझ्या लेखी तक्रारी वरून दोन शासकीय पंच व पोलीस पथक यांचे समक्ष लोकसेवक श्री अमलू यांनी माझ्याकडे माझे कामाच्या ना हरकत प्रमाणपत्रा करीता लाच मागितली किंवा कसे? याबाबत दिनांक १२/०९/१८, १७/०९/१८, १८/०९/१८, २६/०९/१८ रोजी पडताळणी करण्यात आली. दिनांक २८/०९/१८ रोजी केलेल्या पडताळणीत श्री अमलू यांनी मी पुर्नविकास करीत असलेल्या बिल्डींगच्या ना हरकत प्रमाणपत्रासाठी रू. १८,००,०००/—इतकी लाच मागुन, तडजोडी अंती रू. १३,५०,०००/—इतकी लाच स्विकारण्याचे मान्य केले. त्याबाबतचा सविस्तर पडताळणी पंचनामा करण्यात आला आहे. लोकसेवक हे लाच स्विकारण्याची दाट शक्यता असल्याने गोपनियतेच्या दृष्टीने त्यांचे विरूध्द अदयाप गुन्हा नोंद करण्यात आलेला नाही.

दिनांक २८/०९/१८ रोजी श्री अमूल यांचेशी झालेल्या चर्चेन्वये मी दिनांक ०६/१०/२०१८ रोजी माझे माणसाच्या मार्फतीने म्हाडा कार्यालयात, सदर ना हरकत प्रमाणपत्रा करीता डिमांड ड्राफ्टने रूपये १०,०००/—शासकीय फी भरली आहे .

त्यानंतर मी दिनांक ०८/१०/२०१८ रोजी ला.प्र.वि.कार्यालयात पो नि वळवी यांचे समक्ष गोपनिय कक्षात हजर झालो. त्यानंतर पो.नि. वळवी यांनी माझे व पंचांचे वक्तव्य व्हॉईस रेकॉर्डवर ध्वनीमुद्रीत केल्यावर, मला माझे मोबाईलचा स्पिकर ऑन करुन, लोकसेवक अमुल यांना मोबाईलवर कॉल करून माझे काम झाले आहे का, याची विचारणा करण्यास सांगितले. त्यानुसार मी लोकसेवक यांना फोन केला असता, त्यांनी मला दुपारी फोन करून मग येण्यास सांगितले. त्यानुसार मी दोन पंचासमक्ष माझे मोबाईलचा

स्पिकर ऑन करुन, लोकसेवक अमुल यांना मोबाईलवर फोन केला असता, लोकसेवक यांनी आज साहेब आलेले नाहीत, मी तुम्हाला फोन करून सांगतो असे मला सांगितले. परंतु त्यानंतर त्यांचा फोन आला नाही.

दिनांक ०९/१०/२०१८ रोजी मी ला.प्र.वि.कार्यालयातील गोपनिय कक्षात ११.४५ वा. हजर झालो. लोकसेवक श्री अमूल यांनी मागितलेली लाचेची रक्कम रू. १३,५०,०००/—ही माझ्या कडे पूर्ण नसल्याने मी माझ्या कडे असलेले बचती मधील रूपये ५,००,०००/— घेवुन आल्याचे पो नि वळवी यांना सांगितले. तसेच सदरची रक्कम ही मी माझे वैयक्तिक बचतीमधील असल्याचे मी सांगितले. त्यानंतर लोकसेवक यांचा मला फोन न आल्याने पो.नि. वळवी यांनी माझे व पंचांचे वक्तव्य व्हॉईस रेकॉर्डवर ध्वनीमुद्रीत केल्यावर, मी माझे मोबाईलचा स्पिकर ऑन करुन, लोकसेवक अमुल यांना मोबाईलवर कॉल करून माझे काम बाबत विचारणा केली असता, त्यांनी दुपारी ०३.०० वा.पर्यत कार्यालयात येणे करीता सांगितले. सदर सापळा कारवाईत उर्वरीत लाचेची रक्कम रू.८,५०,०००/—ही खेळण्यातली वापरण्यात येईल असे पोनि वळवी यांनी मला सांगितले.

त्यानंतर पोनि वळवी यांनी मला पुढे करण्यात येणाऱ्या सापळा कारवाईच्या अनुषंगाने सविस्तर माहीती दिली. माझी अंगझडती घेवुन, ॲन्थ्रासिन पावडरचे उपयोग, गुणधर्म, प्रात्यक्षिक दाखवणे, मी हजर केलेल्या तसेच खेळण्यातील नोटांना ॲन्थ्रासिन पावडर लावणे, सदरच्या चलनी नोटांची बंडले मी आणलेल्या फिक्कट हिरव्या रंगाच्या कागदी पाकीटात ठेवुन पाकीट घडी केल्यानंतर, चिकट पट्टीने चिटकवुन पाकिटावरही ॲन्थ्रासीन पावडर लावणे व सदरचे पाकीट हे माझ्याकडे असलेल्या पांढऱ्या रंगावर गुलाबी रंगाची फुलांची नक्षी असलेल्या प्लास्टीक पिशवीत अलगद ठेवुन माझ्याकडे देणे, लाच स्विकृती नंतर इशारा करणे याबाबत पंचासमक्ष कारवाई करून त्याबातचा पंचनामा केला आहे.

त्यानंतर मी, पोलीस पथक व पंच लाप्रवि कार्यालयातून सुमारे १४.०० वा.चे सुमारास लोकसेवक यांचे कार्यालयात जाणेसाठी रवाना झालो व पश्चिम द्रुतगती महामार्गाने बांद्रा कोर्टाचे जवळील सर्व्हीस रोड येथे येवुन थांबलो. तेथे पोनि वळवी यांनी पुन्हा आवश्यक त्या सुचना देवुन, व व्हॉईस रेकॉर्डर चालु करून मला लावुन, पंचासह माझे गाडीतुन रवाना केले. मी म्हाडा कार्यालयाचे तिसऱ्या मजल्यावरील कक्ष क्र ४०८ मध्ये लोकसेवकासमोर बसलेलो असतांना, लोकसेवक यांनी मला साडे तेरा लाख रूपये आणले का याबाबत विचारणा केली असता, मी त्यांना साडे तेरा लाख रूपये आणल्याचे सांगितले. तसेच मी माझ्याकामाबाबत विचारणा केली असता, एनओसी पाच वाजेपर्यत तयार होईल असे लोकसेवकाने मला सांगितले. तसेच पैसे घेण्यासाठी त्यांचा एक माणूस अर्ध्या तासात येईल असे मला सांगितले. त्यानंतर लोकसेवक हे मला त्यांचे केबीनमध्ये बसवून केबीनचे बाहेर गेले होते ते सुमारे एक तासानी परत केबीनमध्ये आले व त्यांनी मला एनओसी तैयार नही, कल तीन बजेतक हो जाएगा, आप फोन करके आओ असे सांगुन मला जाण्यास सांगीतल्याने मी लोकसेवकाचे केबीनमधुन बाहेर आलो व पो नि वळवी यांनी खुणेने सांगितल्यानुसार दुसऱ्या मजल्यावरील बाथरूम मध्ये गेलो. तेथे पो.नि. वळवी यांनी मला लावलेला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून तो बंद केला.

त्यानंतर पो.नि. वळवी यांनी मला बांद्रा कोर्टाचे जवळील सर्व्हीस रोड येथे जावून थांबण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी व पंच श्री महाजन माझे खाजगी वाहनातुन सदर ठिकाणी गेलो. थोडयाच वेळात पोनि वळवी व सापळा पथक देखिल सदर ठिकाणी पोहोचले. त्यानंतर पो नि वळवी यांनी मला बाजुला थांबण्यास सांगितले. थोडया वेळाने पो नि वळवी यांनी मला गाडीत बोलावले व लाच रक्कम देण्यासाठी रवाना केल्यापासुन अदयापर्यंत घडलेली हकीकत विचारली असता मी वरीलप्रमाण हकीकत सांगितली. त्यानंतर सापळा कार्यवाही आज होणार नसल्याची खात्री झाल्याने पो.नि. वळवी यांनी आजचा सापळा काढून तो उद्यापर्यंत स्थगित करण्यात येत असल्याचे सर्वाना सांगीतले. त्यानंतर मी, पंच व पोलीस पथक परत ला.प्र.वि.कार्यालयात आलो.

दिनांक १०/१०/२०१८ रोजी लाप्रवि कार्यालय मुंबई येथील गोपनिय कक्षात दुपारी ३.०० वाजता हजर झालो. त्यानंतर पो.नि. वळवी यांनी माझे व पंचांचे वक्तव्य व्हॉईस रेकॉर्डवर ध्वनीमुद्रीत केल्यावर, मला माझे मोबाईलचा स्पिकर ऑन करुन, लोकसेवक अमुल यांना मोबाईलवर कॉल करून माझे काम

झाले आहे का, याची विचारणा करण्यास सांगितले. त्यानुसार मी लोकसेवक यांना फोन केला असता, लोकसेवक यांनी मला अर्धा तासाने फोन करण्यास सांगितले. त्यानुसार पुन्हा थोडया वेळाने माझे मोबाईलचा स्पिकर ऑन करुन, लोकसेवक अमुल यांना मोबाईलवर कॉल केला असता, माझे काम अदयाप पूर्ण झाले नसून. लोकसेवक हे माझ्या कामाची फाईल घेवून त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडे बसले असल्याचे त्यांनी सांगितले. त्यावरून पो.नि. वळवी यांनी माझेशी चर्चा करून लोकसेवक आज रोजी बोलविण्याची शक्यता कमी असल्याने आजचे काम स्थगित करण्यात येत असल्याचे सांगितले.

<u>लोकसेवक श्री. अमुल यांचे वर्णन</u>–

वय अंदाजे ४० वर्षे, उंची ५ फुट ८ इंच, रंग सावळा, मजबूत बांधा, डोक्यावर काळे केस, नेसणीस फुल पॅन्ट फुल शर्ट मराठी व हिंदी भाषा बोलतात.

दि.२८/०९/२०१८ रोजीच्या पडताळणी कारवाई मध्ये लोकसेवक श्री अमुल यांनी लाचेची स्पष्ट मागणी केली होती. तसचे दिनांक ९.१०.२०१८ रोजीच्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक अमूल यांनी पुन्हा लाचेची स्पष्ट मागणी केली परंतू, माझे ना हरकत प्रमाणपत्र तयार नसल्याने त्यांनी लाचेची रक्कम स्विकारली नाही व मला उदया पुन्हा फोन करून येण्यास सांगितले. लोकसेवक हे लाचेची रक्कम स्विकारणार असल्याची दाट शक्यता आहे परंतु, माझे ना हरकत प्रमाणपत्र अदयापही तयार न झाल्याने लोकसेवकाने लाचेची रक्कम अदयाप स्विकारलेली नाही. सदरचे ना हरकत प्रमाणपत्र तयार होताच लोकसेवक अमूल हे, लाचेची रक्कम स्विकारतील याची मला खात्री आहे, परंतु सदरचे ना हरकत प्रमाणपत्र कधी तयार होईल याबाबत मी काही सांगु शकत नाही.

तरी दि. २८/०९/२०१८ व दि. ०९/१०/२०१८ रोजीच्या माझ्या तक्रारीची पंचा समक्ष झालेल्या पडताळणी मध्ये लोकसेवक श्री अमुल बुधकोंडवार, उप अभियंता, म्हाडा कार्यालय, मुंबई यांनी माझे कडे रु. १३,५०,०००/–लाचेची मागणी करुन, सदर लाचेची रक्कम दि. २८/०९/२०१८ व दि. ०९/१०/२०१८ रोजी झालेल्या संभाषणात स्विकारण्याचे कबुल केले आहे. त्यामुळे माझी लोकसेवक श्री. अमुल बुधकोंडवार, उप अभियंता, म्हाडा कार्यालय, बांद्रा, मुंबई यांचे विरूध्द वरील प्रमाणे फिर्याद असुन कायदेशीर कारवाई होण्यास विनंती आहे.

माझे म्हाडा कार्यालय, बांद्रा, मुंबई कार्यालयातील लोकसेवक अधिकारी श्री. अमुल, उप अभियंता यांचेशी पुर्व वैमनस्य नाही किंवा माझे त्यांचेशी आर्थिक देण्या–घेण्याचे व्यवहार नाहीत.

माझा जबाब संगणकावर मराठीत संगणीकृत केला असून, तो मला हिंदीमधून वाचून समजावून सांगितला, तो माझे सांगणे प्रमाणे बरोबर आहे.

Shaheed

समक्ष,

17/10/2018

(जगदिश वळवी )
पोलीस निरिक्षक,
लचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.